FORM-1A N.C.R.B.

I.I.F.-I

# पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

0154194

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( **Under Section 154 Cr. P.C.)**

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station लाप्रवि, पहिली खबर क्र. FIR No. 35, वर्ष Year 2022, दिनांक Date 11/10/22

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंध अधि. 1988 कलमे Sections 7
   (ii) अधिनियम Act ......................, कलमे Sections ......................
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ......................

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day ............, तारीख पासून Date from 19/8/22 वेळ Time 17.30, तारीख पर्यंत Date to 26/8/22 वेळ Time 2.20 वा.
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date ......................, वेळ Time ............
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 45/22, तारीख Date 11/10/22 वेळ Time 17.00

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral —

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ............, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ............
   Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name मानखुर्द जकात नाका जवळ, ठिकाणाचे नंबर No. if any ......, गल्ली Ward मुंबई, रस्त्याचे नाव Name of road पनवेल हायवेवर
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place मानखुर्द, गाव Village मुंबई, पोस्ट Post 43, तालुका Taluka —, जिल्हा Dist. —, राज्य State —
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station —, तालुका Taluka —, जिल्हा Dist. —, राज्य State —

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name अब्दुल्ला शेख (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name याकुब शेख
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age 32 वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. 8655000314
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. —, दिल्याचा दिनांक Date of Issue —, दिल्याचे ठिकाण Place of Issue — (f) व्यवसाय Occupation व्यवसाय
   (g) धर्म Religion मुस्लिम, जात Caste ............, जनजात Sub-Caste ............
   (h) पत्ता Address रुम नं. 102, गल्ली / सर्व्हे नं. Ward ......, घर / नाव नं. House/Name No. बिल्डिंग नंबर 94, फोन / मो. नं. Phone/Mo. No. ......, पॅन नं. PAN No. —, वोटर्स नं. Card No. बालाजी
   रस्त्याचे नाव Road सोसायटी, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place मानखुर्द, गाव Village (पश्चिम), पोस्ट Post मुंबई, पो. स्टे. P. Stn. ............
   तालुका Taluka ............, जिल्हा Dist. ............, राज्य State ............, सध्याचा पत्ता Present Address वरील प्रमाणे

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)
   किशोर आनंदास खरात, वय 47 वर्षे, पोलीस निरीक्षक मानखुर्द पोलीस ठाणे, मुंबई 400043,

Y.P.P.–800 Reg.–(25×6=150 Lvs.)–2-2018–PA3–(K) 829

यातील फिर्यादी नामे श्री अब्दुल्ला याकुब शेख, वय ३२ वर्षे यांचा आज दिनांक 11/10/2022 रोजी स्वतंत्र कागदावर मराठीतून संगणकावर टंकलिखित केलेला जबाब दाखल नमुद गुन्ह्याच्या प्रथम खबरी अहवाल संबोधण्यात येत आहे.

समक्ष

(उमेश कोरडे)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई.

(ABDULLAH. Y. SHAIKH)

जबाब दिनांक ११/१०/२०२२

श्री. अब्दुल्ला याकुब शेख, वय ३२ वर्षे, धंदा — व्यवसाय, राहि — रूम नं. १०२, बिल्डींग नं. ९४, श्री बालाजी को ऑप हाउसिंग सोसायटी, न्यु म्हाडा कॉलनी, मानखुर्द (प.), मुंबई. मोबाईल क्रमांक ८६५५०००३१४. आधार कार्ड नंबर — ५४६६ ०६३० ९०७०.

---

मी वरिलप्रमाणे असुन नमुद पत्त्यावर २२ वर्षापासुन वडील नामे याकुब शेख, वय ६० वर्षे, आई नामे जमिला शेख, वय ५२ वर्षे, पत्नी कमरूनिस्सा, वय ३२ वर्षे व तीन मुलांसह राहावयास आहे.

म.न.पा. एम. ईस्ट. वॉर्ड येथे जमा होणाऱ्या घनकचऱ्यावर पुर्नप्रक्रिया केली जाते. सदर कामाकरिता बीएमसी ने व्हायाग्रिन इंडीया हको सर्व्हिस कंपनी, अंधेरी, मुंबई या कंपनीला कॉन्ट्रॅक्ट दिले आहे. सदर कंपनीचे सबकॉन्ट्रक्ट माझी कंपनी नामे ''महाडिजिटेक मल्टीवेंचर एल.एल.पी.'' हिने घेतले आहे. माझी कंपनी घनकचऱ्याची साठवणुक तसेच त्यावर प्रक्रिया करण्याचे काम करते. घनकचऱ्यावर पुर्नप्रक्रिया झाल्यानंतर निर्माण झालेले खत हे मी राहत असलेल्या परिसरातील सोसायटयांना त्यांच्या आवश्यकतेनुसार देण्याचे काम मी करतो. नमुद व्यवसायातुन मिळणाऱ्या उत्पन्नावर माझी उपजिवीका चालते.

दिनांक १४/०८/२०२२ रोजी मला मानखुर्द पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक श्री खरात यांनी मानखुर्द पोलीस ठाणेस भेटण्याकरीता बोलाविले त्याप्रमाणे मी त्यांना भेटण्याकरिता गेलो असता, त्यांनी माझे विरूध्द नोंद असलेल्या तीन गुन्हयांच्या अनुषंगाने माझेवर तडीपारीची कारवाई करणार असल्याचे सांगुन सदरची कारवाई न करण्याकरिता माझेकडे २,००,०००/— रू. ची मागणी केली. मी घाबरलो असल्याने माझे जवळील २५,०००/— रू श्री खरात यांना दिले होते. त्यानंतर त्यांनी मला उर्वरित रक्कमेकरिता वारंवार माझे मोबाईलवर फोन केले. परंतु मला लाच देण्याची इच्छा नसल्याने मी श्री खरात यांच्याविरोधात लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी येथे दिनांक १८/०८/२०२२ रोजी लेखी तक्रारअर्ज दिला.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे दिलेल्या तक्रारअर्जाच्या अनुषंगाने मला दिनांक १९/०८/२०२२ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई कार्यालयात बोलाविण्यात आले आणि सदरवेळी पोलीस निरीक्षक श्री. उमेश कोरडे, सपोआ श्री. सरदार नाळे यांनी करावयाच्या कारवाई संदर्भात कार्यप्रणालीची माहिती दिली व माझे तक्रारीची पडताळणी करण्याकरीता दोन शासकीय पंच व इतर पोलीस पथक तयार केले व मला पडताळणी दरम्यान घ्यावयाच्या दक्षते संदर्भात सुचना दिल्या. त्यानुसार आम्ही पंचासमवेत रवाना होवुन टाईल्स स्टुडीओ, पीडब्लुडी मैदान, घाटकोपर मानखुर्द लिंक रोड येथे पोहचलो व त्यानंतर पो नि कोरडे यांच्या सुचनेनुसार व्हॉईस रेकॉर्डर चालु करून मी माझे मोबाईल क्रमांक ८६५५०००३१४ वरून लोकसेवक यांच्या मोबाईल क्रमांक अनुक्रमे ९८७०४५८४३५ व ७०२१७६९५९५ यावर संपर्क केला असता, त्यांनी प्रतिसाद दिला नाही. त्यानंतर काही वेळातच लोकसेवकाने त्यांचे ९८७०४५८४३५ वरून माझे मोबाईल क्रमांक ८६५५०००३१४ वर संपर्क करून कार्यालयाजवळ बोलाविले. त्याप्रमाणे पोनि कोरडे यांनी माझे शर्टच्या आतील बाजुस व्हॉईस रेकॉर्डर लावुन पंचासमवेत मला लोकसेवक यांचे कार्यालयात भेटण्याकरीता पाठविले. त्याठिकाणी मी लोकसेवक यांना भेटलो व आमच्यात बोलणे झाले असता लोकसेवक यांनी मला मानखुर्द रेल्वे स्टेशनजवळील पोलीस चौकीजवळ बोलाविले. त्याप्रमाणे आम्ही असे मानखुर्द रेल्वे स्टेशन येथे गेलो असता लोकसेवक हे तेथुन मंगलमुर्ती चौकीकडे गेले असल्याची माहिती मिळाली म्हणून तेथून मंगलमुर्ती चौकीकडे गेलो असता लोकसेवक हे त्याठिकाणाहुन निघुन जात असल्याचे आम्हास दिसले म्हणून पो नि कोरडे यांचे सुचनेप्रमाणे मी लोकसेवकास फोन केला असता लोकसेवक यांनी अर्ध्या तासाने फोन करतो असे सांगितले. त्यानंतर आम्ही लोकसेवक यांच्या कॉलची वाट पाहत थांबून राहीलो. बराच वेळ झाला

समक्ष

(उमेश महेश कोरडे )
पोलिस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Abdull
(ABDULLAH. Y. SHAIKH)

तरी लोकसेवकाने कॉल न केल्याने व सदर दिवशी दहीहंडी या सणाच्या बंदोबस्तात लोकसेवक व्यस्त असल्याने सदर दिवसाची कारवाई स्थगित करून यापुढे लोकसेवक पुन्हा मला कॉल करतील तेव्हा कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरले.

त्यानंतर दिनांक २१/०८/२०२२ रोजी लोकसेवकाने मला फोन करून भेटण्याकरिता बोलाविले सदरबाबत मी पोनि कोरडे यांना माहिती दिली असता दिनांक २१/०८/२०२२ रोजी पुन्हा पडताळणी कारवाई करण्याचे पोनि कोरडे यांनी सांगितले. त्याप्रमाणे दिनांक २१/०८/२०२२ रोजी पडताळणी कारवाई दरम्यान मी लोकसेवकास संपर्क केला असता लोकसेवकाने फोन करून मला मानखुर्द जकात नाका येथे बोलाविले. त्याप्रमाणे पोनि कोरडे यांनी माझे शर्टच्या आतील बाजुस व्हॉईस रेकॉर्डर लावून पंच क्र. ०१ यांच्यासमवेत खाजगी मोटारसायकलने लोकसेवकास भेटण्याकरीता गेलो. त्यावेळी आमच्यामध्ये चर्चा झाली. चर्चे दरम्यान **"तीन है... तीन... तीन सौ सात का... तीन सौ छबीस का है... और ये तीनों मारामारी का है... तडीपार ही है..."** तसेच **"वो काम करके दे.. इस काम का टेन्शन मत ले वो अपुन मेरे हात मै है "** असे बोलले तसेच मी त्यांना पैशाची अडचण असल्याचे सांगितले असता त्यांनी **"अरे .. वो बेचना यार.. अभी तेरे पास चार है ना.."** असे सांगुन माझेकडील असलेले झोपडे विकण्याबाबत सुचविले. त्यानंतर **" बोलो क्या ... भरोसा नही है क्या.. आराम से बेच सकता है .. तुम बोलो .. तुम बोलो जो देना है ... मै कुछ नही तु बोला जो देने है ... मै क्या बोला जो देने का .... मै कुछ नही तुम बोलो जो देने है ... मै क्या बोला क्या इतना चाहिए ... उतना चाहिए... बोलो ना भाई .. मै ने बोला तुम को... "** यानंतर मी त्यांना **" पच्चास हजार तुम लेलो और खतम कर दो "** त्यानंतर त्यांनी **" पच्चास हजार मे नही होता कुछ "** असे बोलले असता मी त्यांना **" पच्चास हजार मे होगा"** त्यावेळी त्यांनी **"तु मेरे को एक पच्चात्तर बोला था "** त्यानंतर मी संभाषणादरम्यान त्यांना एक तासाने येतो असे सांगुन मी तेथुन निघुन पंचासमवेत मोटार स्कुटरने इनोव्हा मोटारकार थांबलेल्या ठिकाणी परत आलो.

त्यानंतर मी पुन्हा लोकसेवकाच्या मोबाईल क्रमांकावर फोन करून लाचेच्या रक्कमेच्या अनुषंगाने पुन्हा चर्चा करावी असे ठरल्याने मी लोकसेवक यांच्या मोबाईल क्रमांक ९८७०४५८४३५ वर संपर्क केला असता आमच्यात **" कल परसो देखा जाएगा ना " " अरे... वो छोड दो वो चार मे से एक बेच डालो... दो बेच डालो... इतना टेंशन लेता है... मेरा रहता तो कब का डालता था बेच... सिदिसी बात है... बात खत्म करने का तो पान लगा रहा हे अभी तक... छोड दो ना ..." " फिर वैसे ही करता है... एक भी काम मै इसका वो भी नही किया मेरा काम... ये... ये भी नही काम किया... कौनसा... मेरा तो कौनसा काम हे मैने तुम्हारा सब काम किया... तुमने मेरा एक भी काम नही किया अभी तक..."** असे संभाषण ऐकले. लोकसेवक यांचा फोन आल्यानंतर पुढील कारवाई करण्याबाबत सर्वानुमते ठरले.

दिनांक २४/०८/२०२२ रोजी लोकसेवक यांचा माझे मोबाईलवर फोन आल्याने मी पो. नि. कोरडे यांना त्याबाबत सांगितले असता त्यांनी दिनांक २५/०८/२०२२ रोजी सापळा कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगितले त्यानुसार दिनांक २५/०८/२०२२ रोजी १३:५५ वाजेच्या दरम्यान कारवाईस पंच व पथकासमवेत रवाना होवुन लोकसेवकास मी माझे मोबाईल क्रमांक ८६५५०००३१४ वरून लोकसेवक यांच्या मोबाईल क्रमांक ९८७०४५८४३५ वर संपर्क केला असता लोकसेवक हे रात्रपाळी कर्तव्य करून घरी निघुन गेले असल्याने व त्यांनी रात्री २१:३० वाजेच्या सुमारास बोलाविल्याने पुढील कारवाई रात्री २१:३० वाजेच्या नंतर करण्यात येणार असल्याचे पो नि कोरडे यांनी सांगितले.

त्यानुसार मी, पंच व पोलीस पथक रात्री २०:०० वाजेच्या सुमारास रवाना होवुन घाटकोपर – मानखुर्द लिंक रोडच्या कडेला, मंदीराजवळ, पोचलो व मी मी माझे मोबाईल क्रमांक ८६५५०००३१४ वरून लोकसेवक यांच्या मोबाईल क्रमांक ९८७०४५८४३५ वर संपर्क केला असता त्यांनी मला कार्यालयात भेटण्याकरिता बोलाविले असल्याने पुढील कारवाई करण्याचे

समक्ष

(उमेश महेश कोरडे )
पोलिस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

(ABDULLAH. Y. SHAIKH)

ठरले. त्यानुसार पो नि कोरडे यांना माझेकडील बचतीतील ५०,०००/— रू लाचेची रक्कम म्हणुन वापरण्याकरिता काढुन दिले. त्यावेळी पो नि कोरडे यांनी पो ह चा सय्यद यांची ओळख करून देवुन ते चालक असुन प्रत्यक्ष कारवाईत भाग घेणार नसल्याचे सांगितले. पो ह चा सय्यद यांनी मला व पंचाना अॅंथ्रासिन पावडर चे गुणधर्म समजावुन सांगुन समक्ष प्रात्यक्षिक समजावुन सांगितले. त्यानंतर लाचेच्या रक्कमेच्या नोटांना दोन्ही बाजुने कापसाच्या बोळयाने अॅंथ्रासिन पावडर लावली व सदरची रक्कम माझे पॅटच्या उजव्या बाजुस असलेल्या खिशामध्ये ठेवल्या. तसेच लाचेच्या रक्कमेची मागणी होईपर्यत सदर चलनी नोटांना स्पर्श न करण्याच्या सुचना दिल्या. तसेच लोकसेवकाने मागणी केल्यानंतर उजव्या हाताने लाचेची रक्कम काढुन लोकसेवकास दयावी तसेच सदरची रक्कम कोठे ठेवतात हे पाहुन त्यानुसार ठरल्याप्रमाणे पुर्वनियोजित इशारा करावा याबाबत मला सुचना दिल्या. त्यानंतर मी पंच क्र. ०१ यांच्यासमवेत रवाना होवुन लोकसेवक यांच्या कार्यालयात त्यांना भेटण्याकरिता गेलो असता आमच्यात झालेले संभाषण लोकसेवकाने त्यांना " **ए निचे रूक.... मै आता हु... " असे सांगितले त्यावेळी " निचे गाडी मे हुं " असे तक्रारदार यांनी सांगितले व तक्रारदार पुन्हा त्यांचे गाडीत येवून बसले. थोड्या वेळातच लोकसेवक हे त्यांचे गाडीचे ठिकाणी आले व " बोल भाई... बोल... तुम निकलो... मुझे एक अ... कंप्लेट लिखना है... है... करता हु तुमको फोन थोडा... आधा एक घंटा लगेगा... तुम्हे फोन करता हु मै... मै फोन करता हु... करता हु फोन आधा घंटा... आधा घंटा काम है" असे बोलले असता त्यांना त्यांनी " ठिक है..."** असे बोलून लोकसेवक तेथून निघून गेल्यानंतर मी व पंच क्र. ०१ हे त्यांचे इनोव्हा मोटारकार मधून आलो.

त्यानंतर पो नि कोरडे यांचे सुचनेनुसार लोकसेवक हे अर्ध्या तासात मला फोन करणार असल्याने लोकसेवक यांच्या कॉलची वाट पाहत थांबुन राहिलो. परंतु बराच वेळ होवुन लोकसेवक यांचा कॉल न आल्याने पो नि कोरडे यांचे सुचनेनुसार मी माझे मोबाईल क्रमांक ८६५५०००३१४ वरून लोकसेवक यांच्या मोबाईल क्रमांक अनुक्रमे ९८७०४५८४३५ व ७०२१७६९५९५ यावर संपर्क केला असता त्यांनी कॉलला प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे मी व पंच क्र. १ असे पुन्हा लोकसेवक यांच्या कार्यालयात जावुन भेट घ्यावी असे पो नि कोरडे यांनी सांगितले. त्यानुसार माझे शर्टच्या आतील बाजुस पुन्हा व्हॉईस रेकॉर्डर लावुन मी व पंच क्र. १ रवाना झालो. त्यावेळी लोकसेवक हे त्यांच्या कार्यालयात नव्हते म्हणुन मी तेथील पोलीसांकडे लोकसेवक कोठे आहेत याविषयी विचारणा केली असता तेथील हजर पोलीसांनी " **खरात साहब... बाहर गए... राउंड पे.. . नही है... मोबाईल भी बंद आ रहा है... मोबाईल भी बंद आ रहा है... पता नही... राउंड पे तो गए है...**" असे सांगितल्यानंतर ते व पंच क्र.०१ हे त्यांचे मोटारकारमधुन परत आलो. त्यानंतर सदरची कारवाई स्थगित करण्यात आली. त्यानंतर लोकसेवक यांनी मला फोन केला नाही तसेच मी त्यांना भेटण्याकरिता पोलीस ठाणेस पुन्हा गेलो असता ते मला पोलीस ठाणेस भेटले नाहीत त्यामुळे ते भविष्यात देखील माझेकडुन लाचेची रक्कम स्विकारतील असे मला वाटत नाही.

तरी पोलीस निरीक्षक श्री खरात, नेमणूक — मानखुर्द पोलीस ठाणे, मुंबई यांनी माझेविरूध्द मानखुर्द पोलीस ठाणेस दाखल असलेल्या तीन गुन्हयांत तडीपारी कारवाई न करण्याकरिता माझेकडे २,००,०००/— रूपयांची मागणी करून त्यामधील २५,०००/— रूपये स्विकारून उर्वरीत १,७५,०००/— रक्कमेचा माझेकडे तगादा लावून तडजोडीअंती ५०,०००/— रूपये लाचेची मागणी केली व सदर लाचेची रक्कम स्विकारण्याचे कबुल केल्याने माझी पोलीस निरीक्षक श्री खरात, नेमणूक — मानखुर्द पोलीस ठाणे, मुंबई यांच्याविरोधात कायदेशीर कारवाई होणेकरीता तक्रार आहे.

माझा वरील जबाब मराठीमध्ये टंकलिखीत केला असून मला मराठीतुन वाचून व हिंदीतून समजावून सांगीतला तो मी सांगीतल्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष
[signature]
(उमेश महेश कोरडे )
पोलिस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

[signature] (ABDULLAH. Y. SHAIKH)

तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे फिर्यादीकडून तसेच पडताळणी व चौकशी करून
Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

.........................................................................................................

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ............ —
Total Value of properties stolen / involved
(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ............ —
Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमुद तारीख व ठिकाणी आरोपी लोकसेवकाने तक्रारदार यांचेवर दाखल गुन्ह्यात तडीपार कारवाई न करण्याकरीता रु. 2,00,000/- ची मागणी करून त्यातील रु. 25,000/- स्विकारून उर्वरीत रक्कमेकरीता वारंवार फोन करून तडजोडीअंती फिर्यादीकडून रु. 50,000/- स्वतःच्या फायद्याकरीता परितोषा- खेरीज लाचेची रक्कम दि. 2/8/2022 रोजी केलेल्या पडताळणीमध्ये मान्य करून स्विकारण्याचे कबूल केले म्हणून त्यांच्याविरुद्ध कलम 7 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 अन्वये गुन्हा नोंद.

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :
उमेश कोरडे, पोलीस निरीक्षक

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,
.........................................................................................................

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ....................., जिल्हा ....................., राज्य ....................

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)................ Rank................ No................ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to.................................................. (3) Transferred to P. S. ..................................................
District.................................................. on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station
संपूर्ण नाव Name ...उमेश कोरडे...
पदनाम Rank ...पोलीस निरीक्षक...
तपासिक अं. चा कोड क्र.
Posting
Code No. of I. O. ..................................................

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख....................
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**